CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २७८ वा ▶ गुरुवार दि. ३ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

### प्रसिद्ध कलादिग्दर्शक नितीन देसाई यांची आत्महत्या

**मुंबई ।** कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी वयाच्या ५८ व्या वर्षी गळफास घेत आयुष्य संपवलं आहे. त्यांच्या निधनाने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. नितीन देसाई हे कला दिग्दर्शक असण्यासोबत अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शकही होते. अनेक सुपरहिट सिनेमांच्या यशात नितीन देसाई यांचा मोलाचा वाटा आहे. नितीन देसाई यांनी अनेक सुपरहिट सिनेमांचं कला दिग्दर्शन करण्यासोबत एन. डी स्टुडिओची निर्मितीदेखील केली आहे. नितीन देसाई यांनी मराठी-हिंदीसह हॉलिवूडच्या सिनेमांचे सेटही उभारले आहेत.



## न्यूज कॉलम

### शेताच्या बांधावरून भावाला मारहाण

**साक्री ।** शेतीचा बांध का कोरला, असे विचारल्याच्या रागातून साहेबराव परबत वाघ (वय ५१ रा. हट्टी खुर्द ता. साक्री) यांना लहान भाऊ भिमराव वाघ याने लोखंडी गजने हात व पायांवर मारहाण केली. तर सुनंदाबाई भिमराव वाघ हिने काठीने मान व डोक्यावर मारहाण करीत केली. त्यात साहेबराव हे गंभीर जखमी झाले. तसेच शिवीगाळ करीत यापुढे शेतात दिसला तर तुझे दोन्ही पाय तोडून टाकु, अशी धमकी दिली. याबाबत साहेबराव वाघ याच्या तक्रारीवरून निजामपूर पोलिसात दाम्पत्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

### महात्मा गांधी रोडवर पोलिसांकडून कारवाई

**नाशिक ।** महात्मा गांधी रोड परिसरातील दुकानांसमोरील पार्क केलेल्या वाहनांवर पोलिसांनी दंडात्मक करवाईचा बडगा उगारला. या कारवाई विरोधात येथील व्यापारी वर्गाकडून दुकाने बंद करत निधेध नोंदवण्यात आला. महात्मा गांधी रोड परिसरात पोलिसांचे पथक दाखल होत पार्क केलेल्या गाड्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. अचानकपणे पोलिसांनी ही कारवाई केल्यामुळे येथील व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडाली.

# संभाजी भिडेंविरोधात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत विरोधक आक्रमक

### विरोधकांचा विधान परिषदेतून सभात्याग

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून पुन्हा सुरू झाले आहे. मधल्या काळात राज्यभर झालेल्या पावसामुळे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुणे दौऱ्यामुळे अधिवेशनाला दोन दिवसांची सुटी देण्यात आली होती. दरम्यानच्या काळात काँग्रेसने विधानसभेतील विरोधी पक्ष नेतेपदी विजय वडेट्टीवार यांची नियुक्ती जाहिर केली. विधिमंडळात आज शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे संस्थापक संभाजी भिडे व अन्य काही कळीच्या मुद्यावर सत्ताधारी व विरोधकातं जोरदार खडाजंगी झाली.

शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष संभाजी भिडे यांनी महात्मा गांधींविरोधात केलेल्या वादग्रस्त विधानामुळे राजकीय वातावरण तापले आहे. राज्यभर आंदोलनं, निषेध सुरू असतानाच पावसाळी अधिवेशनातही त्याचे तीव्र पडसाद उमटत आहेत. भिडेंविरोधातला संघर्ष दिवसागणिक धारदार होत असतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट सभागृहातच संभाजी भिडे यांचा 'गुरूजी' असा उल्लेख आणि त्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला. विरोधकांचा हल्ला परतवून लावतानाच फडणवीसांनीही भिडे हे आम्हाला गुरूजीच वाटतात, त्यात तुम्हाला काय अडचण..? असा प्रतिसवाल केला.

#### व्हिडिओ चित्रीकरण नाही

**देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संभाजी भिडे गुरूजी यांना नोटीस पाठविली असून अमरावतील पोलिसांनी पाठवलेली नोटीस त्यांनी स्वीकारली आहे. त्यानुसार पोलिस तपास करत आहे. तर जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात दाखल केलेली तक्रार अमरावती पोलिसांकडे वर्ग केली आहे. त्यासोबत जे व्हिडिओ आव्हाडांनी दिले आहे त्याचा ही तपास पोलिस करणार आहेत. मात्र, हे व्हिडिओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे ते अमरावतीमधील नाही. पोलिसांनी असे सांगितले आहे की त्या सभेला व्हिडिओ आपल्याकडे नाही. कुठल्याही राष्ट्रीय नेत्यांच्या संदर्भात कुणीही चुकीचे वक्तव्य करणे सहन केले जाणार नाही. त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी म्हटले आहे.**



#### महापुरुषांवर बोलण्याचा अधिकार नाही

**देवेंद्र फडणवीस म्हणाले की,संभाजी भिडे गुरूजी हे हिंदुत्वाकरता काम करतात. ते बहुजन समाजाला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्याला जोडतात. त्याचे कार्य चांगले असले तरी महापुरुषांवर असे बोलण्याचा त्यांना अधिकार नाही. वीर सावरकर यांच्यावर अक्षेपार्ह लिखान सुरू आहे. काँग्रेसचे मुख्यपत्र असलेल्या वृत्तपत्रात शिदोरी नावाने सदर लिहित आहे. यात वीर सावरकर माफीवीर होते, वीर सावरकर समलैंगिक होते असे लिखान केले जाते. ज्या प्रमाणे संभाजी भिडे गुरूजी यांच्या वक्तव्याचे येथे कारवाई करण्यात येईल त्याचप्रमाणे वीर सावरकरांवर आक्षेपार्ह वक्तव्य करण्याऱ्या शिदोरीवरही गुन्हा दाखल करण्यात येईल.**

#### संभाजी भिडेंची डिग्री कोणती?

**संभाजी भिडे अत्यंत फ्रॉड माणूस आहे. त्याची डिग्री कोणती आहे? त्याने कुठे शिक्षण घेतले? हा कुठे प्राध्यापक होता? सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, हा माणूस सोने गोळा करत आहे. कायद्यानुसार, एखाद्या संस्थेला वर्गणी गोळा करायची असेल, तर त्या संस्थेला जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदणी करावी लागते. त्याचा हिशेब द्यावा लागतो. पण हा माणूस कितीतरी टनाने सोने गोळा करत आहे. तो सध्या प्रत्येकाकडून १ ग्रॅम सोने घेत आहे. लोकांची व तरुणांची हेतूपुरस्सर दिशाभूल करत आहे.**

शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे प्रमुख संभाजी भिडे यांच्या वादग्रस्त वक्तव्यांचे बुधवारी विधानसभेत तीव्र पडसाद उमटले. भिडेंवर कारवाई करण्याच्या मागणीवरून विरोधकांनी अवघे सभागृह डोक्यावर घेतले. त्यानंतर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई करण्याची ग्वाही दिली. संभाजी भिडे यांचे कार्य चांगले आहे. पण त्यांना महापुरुषांवर वाईट बोलण्याचा अधिकार कुणीही दिला नाही, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त लिहिणाऱ्या काँग्रेसच्या शिदोरी या मुखपत्रावरही कारवाई करण्याचा इशारा दिला.

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन केले असून ते म्हणाले की, अमरावतीमध्ये संभाजी भिडे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना पुस्तक वाचून दाखवायला लावले. त्यातील आशयावर त्यांनी वक्तव्य केले आहे. ज्यात एस.के. नारायणचार्य आणि घोष यांनी लिहलेले पुस्तक असून ते स्वतः ला काँग्रेसचे नेते म्हणून घेत आहे. त्यांची पुस्तकातील मजकूर संभाजी भिडे गुरूजी यांनी सहकाऱ्यामार्फत उदगृत केला. यातील एका पुस्तकाचे नाव द कुराण फकीर १९२ पानाच्या पुस्तकात फिरत असल्याचे दिसत आहे. या प्रकरणी अमरावती पोलिस ठाण्यात संभाजी भिडे गुरूजी यांच्यासह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आदिवासी गावांच्या विकासासाठी पंतप्रधान विकास योजनेअंतर्गत बारा कोटींचा निधी मंजूर

### खा. हेमंत गोडसे यांच्या प्रयत्नांना यश



**नाशिक । प्रतिनिधी**

आदिवासी भागातील रहिवाशांना सर्व त्या मूलभूत सुविधा मिळाव्यात, आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावेत यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सततच्या सुरू असलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या आदिवासी तालुक्यातील गावांमध्ये अंतर्गत रस्ते, शाळेच्या वाढीव वर्ग खोल्या, शाळांभोवती वॉल कंपाऊंड, स्मशानभूमीचे बांधकाम आदी कामांसाठी केंद्र शासनाच्या पंतप्रधान आदर्श ग्राम विकास योजनेअंतर्गत सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांसाठी बारा कोटीच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

पंतप्रधान आदर्श ग्राम विकास योजनेअंतर्गत निधी उपलब्ध झाल्याने नाशिक तालुक्यातील सव्वीस, इगतपुरी तालुक्यातील वीस तर त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अठरा गावांमध्ये विकास कामे होणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिली आहे.नाशिक इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर या तालुक्यातील एकूण ६४ गावांमधील विकास कामांसाठी पंतप्रधान आदर्श ग्राम विकास योजनेअंतर्गत दहा कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे. यातून नाशिक तालुक्यातील दुगाव, देवरगांव, देवरगांव (वैष्णवी नगर), तिरडशेत, जलालपूर, पिंपळगाव (ग), सुभाषनगर, शास्त्रीनगर, गंगाम्हाळुंगी, धोंडेगाव (कश्यपनगर), नाईकवाडी, धोंडेगाव, राजेवाडी, चांदशी, ओझरखेड, महादेवपूर, सदगाव, नागलवाडी, लाडची, रायगडनगगर, गणेशगांव, देवठाण, निगडोल, देवघर या गावांमध्ये ५ कोटी ५ लाखांची २७ कामे, इगतपुरी तालुक्यातील अडसरे (खु), निनावी, आंबेवाडी, शेनवड (बु), खैरगांव, सोनोशी, गरूडेश्वर, सोमज, बारशिंगवे (राहुलनगर), सदर कामांमध्ये गावांतर्गत रस्ता काँक्रीटीकरण करणे. जिल्हा परिषद शाळांना संरक्षक भिंत बांधणे तसेच स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण करणे अशी कामे होणार आहेत.

## समाज घडविण्यासाठी युवकांची महत्वाची भुमिका

### नगाव येथे युवा संवादात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचे प्रतिपादन

**धुळे । प्रतिनिधी**



नगाव येथील श्री आण्णासाहेब द.वा.पाटील शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या वतीने महसूल सप्ताहाच्या निमित्ताने युवा संवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.अभिनव गोयल यांनी श्री आण्णासाहेब द.वा.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या संवादात जिल्हाधिकारी म्हणाले की, आपल्या देशाचे भवितव्य युवकांच्या हाती आहे. देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक क्षेत्रात युवकांचे मोलाचे योगदान असे प्रतिपादन यावेळी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य तथा नगाव एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन रामदादा भदाणे उपस्थित होते.

याप्रसंगी महेश शेलार (जिल्हा पुरवठा अधिकारी धुळे),विनोद पाटील (अपर तहसीलदार धुळे शहर), पंडित दावळे (मंडळ अधिकारी नगाव), मनोहर पाटील (मंडळ अधिकारी वलवाडी),कमलेश बाविस्कर (मंडळ अधिकारी मोहाडी),सी एम पाटील (तलाठी नगाव), श्री आर आर पाटील (प्राचार्य नगाव) यांच्यासह श्री आण्णासाहेब द.वा.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नगाव येथिल प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व तहसील कार्यालय धुळे कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन जि.प.सदस्य रामदादा भदाणे यांच्या मार्गदर्शनाने व नगाव मंडल अधिकारी पंडित दावळे यांच्या सहकार्याने श्री आण्णासाहेब द.वा.पाटील, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री आर. आर.पाटील यांनी केले.

## पिंपळनेर ग्रामपंचायतीतर्फे पांझरा नदीचे जलपूजन



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

पांझरा नदीवरील लाटीपाडा धरण पूर्ण क्षमतेने भरून ओव्हर फ्लो झाल्याने ग्रामपंचायत पिंपळनेरतर्फे जलपूजन करण्यात आले.

गेल्या पंधरा दिवसापासून पिंपळनेर पश्चिम पट्ट्यात संतत धार पावसामुळे पांझरेला पूर आला व लाटीपाडा धरण हे पूर्ण क्षमतेने भरून ओसंडून वाहू लागले आहे. धरण भरल्यामुळे पिंपळनेर व परिसरातील जनतेचा पाण्याचा प्रश्न मिटला असून शेती व पिण्यासाठी पाणी मुबलक झाल्याने आनंद व्यक्त करण्यात आला. पिंपळनेर ग्रामपंचायतीतर्फे पांझरा नदीचे जलपूजन लाटीपाडा धरणाच्या सांडव्याजवळ सरपंच देविदास सोनवणे, माजी सभापती संजय ठाकरे, प.स.सदस्य देवेंद्र गांगुर्डे,माजी.प.स.सदस्य पी.एस. पाटील, माजी सरपंच योगेश नेरकर, ग्रा.पं.सदस्य योगेश बधाण, प्रमोद गांगुर्डे, शिवाजी पवार, सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र कोठावदे, सतीश पाटील, पांडुरंग सूर्यवंशी, जे.टी.नगरकर,निलेश कोठावदे, शाम पगारे, नारायण पगारे, पत्रकार सुभाष जगताप, राजेंद्र गवळी,ग्राम विकास अधिकारी एच.एन.अहिरे यांनी जल पूजन करून पांझरा नदीला साडी, खण व नारळाने ओटी भरून नमस्कार करण्यात आला व वरून राजाने पिंपळनेर व परिसरातील पाण्याचा प्रश्न सोडवल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानण्यात आले.

## महावितरणच्या मुख्य अभियंत्यांसमोर उद्योजकांनी वाचला समस्यांचा पाढा

### तातडीने प्रश्न मार्गी लावण्याचे कुमठेकर यांचे आश्वासन

**नाशिक । प्रतिनिधी**




जिल्ह्यातील आणि विशेषतः सिन्नर, दिंडोरी आणि इगतपुरी तालुक्यातील उद्योजकांनी महावितरणचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांच्यासमोर विद्युत खात्याच्या समस्यांचा पाढाच वाचला. आठ दिवसांच्या आत या समस्यांचे निराकरण न झाल्यास उद्योग बंद ठेवण्याचा इशारा त्यांनी दिल्यानंतर हे प्रश्न तातडीने मार्गी लावू, असे आश्वासन कुमठेकर यांनी दिल्याने उद्योजकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

उद्योग जगतासाठी विजेचा पुरवठा अखंडपणे सुरू राहणे गरजेचे असते. परंतु अनेकदा पूर्वसूचना न देता वारंवार विद्युत पुरवठा खंडित करण्यात येतो. शटडाऊनचे प्रकारही घडत असल्याने जिल्ह्यातील उद्योजकांनी महावितरण खात्याच्या गलथान कारभाराबद्दल जोरदार टीकास्त्र सोडून या सर्व समस्यांचे निराकरण व्हावे अशी मागणी त्यांनी निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे यांच्याकडे केली होती. याप्रश्नी त्यांनी तातडीने महावितरणचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांच्याशी संवादाचा कार्यक्रम बुधवारी निमा कार्यालयात आयोजित केला होता. व्यासपीठावर निमाचे उपाध्यक्ष आशिष नहार, सचिव राजेंद्र अहिरे, रवींद्र झोपे, दिंडोरीचे को-चेअरमन योगेश पाटील, सिन्नर विकास समितीचे चेअरमन किरण वाजे, प्रवीण वाबळे तसेच महावितरणचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, कार्यकारी अभियंता राजाराम डोंगरे आदी होते. या बैठकीत सिन्नर, दिंडोरी तसेच इगतपुरी तालुक्यातील उद्योजक आक्रमक असल्याचे चित्र दिसले. उद्योजकांना चांगली सेवा देण्याचा महावितरणचा सातत्याने प्रयत्न राहिला आहे. ज्या तक्रारी असतील त्याची दखल घेऊन त्यात उतरोत्तर सुधारणा कशी होईल, याची काळजी आम्ही घेऊ, असे आश्वासनही कुमठेकर यांनी यावेळी दिले.बैठकीस राजेंद्र वडनेरे, मिलिंद राजपूत, दिलीप वाघ, गोविंद झा, मनिष रावल, श्रीकांत पाटील, संदीप भदाणे, सुधीर बडगुजर, संजय महाजन, कैलास पाटील, बबन चौरे, सचिन कंकरेज, किरण करवा, देवेंद्र विभुते, नितीन धात्रक यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक आणि महावितरणचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरकारी कार्यालयात खासगी दलालांचा सुळसुळाट

आजकाल दलाल आणि दलालीशिवाय कुणाचं पान हलताना दिसत नाही. भक्त भगवान, ग्राहक विक्रेता, देणारा घेणारा, कर्ता-करविता, पिकवणारा - विकणारा, नेता-कार्यकर्ता, गुरू-शिष्य, नोकर मालक या सगळ्यांच्या मध्ये कुठे ना कुठे दलालांचे अस्तित्व अगदी हटकून दिसून येते. साहजिकच सत्ता तरी याला कशी अपवाद राहील, उलट सत्ता आणि दलाल यांचे एक अतूट आणि पारंपरिक नातेच आहे.



#### राजकीय पदाधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांवर दबाव

**विविध संघटनांचे पदाधिकारी ओळख सांगून कर्मचाऱ्यांवर कामे करण्यासाठी दबाव आणत आहेत. कार्यालयातील दलालांचा सुळसुळाटामुळे काम करणे अवघड झाल्याच्या तोंडी तक्रारी कर्मचाऱ्यांनी दिल्या आहेत. विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा तहसील कार्यालयात सतत वावर असतो. प्रमाणपत्रे काढून देण्यासाठी नागरिकांकडून पैसे घेतात व काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांवर दबाव आणतात. यामुळे दैनंदिन काम करणे अशक्य झाले आहे. सेतू सुविधा केंद्रात संचिका हाताळताना कर्मचाऱ्यांना पैसे द्यावे लागतात, असे दलालांकडून सांगितले जात असल्याने कर्मचाऱ्यांची बदनामी होत आहे. या दलालांचा नागरिक व कर्मचाऱ्यांना त्रास होत आहे.**

कोणताही सर्वसामान्य माणूस दलालाच्या मध्यस्थीशिवाय सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचूच शकत नाही, अशी सध्याची अवस्था आहे. गुळाला जसे मुंगळे चिकटतात, तसे राज्यात कोणत्याही पक्षाची सत्ता आली तरी काही ठराविक 'दलाल' लगेचच या सत्तेला चिकटतात. सरकारशी निगडित कोणतंही काम या दलालांच्या आणि त्यांच्या दलालीच्या मांडवाखालून गेल्याशिवाय पूर्णच होवू शकत नव्हते, याचा अनेकांनी 'रोकडा अनुभव' घेतला आहे. कोणत्याही शासकीय खात्यातील बदल्या, बढत्या, पदोन्नत्या या दलालांच्याच हातात असल्याचा बोलबाला होता. एवढंच काय पण कोणत्या कामाला किती निधी द्यायचा आणि द्यायचा की नाही, याचा निर्णयसुध्दा या दलाल मंडळींच्या राजीखुशीवरच ठरत असल्याचे तमाम जिल्ह्याच्या कर्णोपकर्णी होते. जिल्ह्यातील सगळ्या शासकीय कार्यालयांमध्ये 'शॅडो मिनीस्टर' म्हणूनच यांचा वावर आहेच. जिल्ह्यातील बहुतांश कंत्राटदार या दलालांच्या 'कृपादृष्टीचे सिंचन' आपल्यावर व्हावे, यासाठी तिष्ठताना दिसायचे. याशिवाय जिल्ह्यात कुठे काही अवैध धंदा चालू करायचा असेल तरीही म्हणे आधी याच दलाल मंडळींचा हात ओला करावा लागत आहे. त्याचा परिणाम म्हणून गेल्या काही महिन्यांमध्ये जिल्ह्यात अवैध धंद्यांना नुसते उधाण आले आहे. बरेचवेळा शासकीय कर्मचारी देखील नागरिकांच्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे देतात. तालुक्यातून सर्व स्तरांतील आणि दुर्गम भागांतील नागरिक शासकीय कार्यालयात आपली कामे करण्यासाठी येत असतात. कामे पूर्ण करण्यासाठी अनेकांना सारख्या चकरा माराव्या लागतात.



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

## धुळ्यातील अजळकर नगरात घरफोडी; मुद्देमाल लंपास

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील अजळकर नगरात वास्तव्यास असलेले वीज वितरण कंपनीतील इंजि.तुषार वराडे यांच्या घरी चोरट्यांनी काल रात्री घरफोडी केली. यात सुमारे एक लाख रूपयांच्या रोकडसह लहान बाळाची सोन्याची बाळी मिळून दीड लाखांचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला.

यासंदर्भात मिळालेल्या वृत्तानुसार, वीज वितरण कंपनीतील इंजि.तुषार रमेश वराडे हे दोन दिवसापुर्वी नातेवाईकांकडे मालेगाव येथे गेले होते. त्यानंतर त्यांनी गडावर जाण्याचा बेत आखला. त्यानुसार ते वणी येथील सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी गेले होते. दरम्यान, बंद घराची संधी साधून चोरट्याने घरफोडी करीत घरातील एक लाखाच्या रोकडसह लहान बाळाची सोन्याची बाळी असा एकूण दीड लाख रूपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला. इंजि. तुषार वराडे हे अजळकर नगरातील त्यांच्या घरी आले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. घरात प्रवेश केला असता कपाटातील कपडे अस्ताव्यस्त विखुरलेले दिसले. त्यामुळे घरफोडी झाल्याचे निदर्शनास येताच त्यांनी धुळे शहर पोलीस ठाण्यात धाव घेत गुन्हा दाखल केला.

## टिळक मंत्राचा जागर

स्वातंत्र्य ज्यावेळी दृष्टिपथातही नव्हते त्यावेळी लोकमान्यांनी भारतीयांमध्ये स्वातंत्र्यासाठी दुर्दम्य विश्वास जागविला, देशवासीयांच्या क्षमतेवर असलेल्या अपार विश्वासातूनच हे घडते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमूद करीत लोकमान्यांच्या अद्भुत नेतृत्वकौशल्याकडे निर्देश केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकमान्य टिळक पुण्यतिथी सोहळ्यात लोकमान्यांबद्दल व्यक्त केलेल्या भावना कोट्यवधी भारतीयांच्या मनातील भावना होत्या. स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासाच्या माथ्यावर झळकणारा 'टिळक', भारताचा गौरव, देशाचे महानायक अशा विशेषणांनी पंतप्रधान मोदी यांनी आधुनिक भारताच्या या शिल्पकाराला वंदन केले. टिळक स्मारक ट्रस्ट अर्थात हिंद स्वराज्य संघाच्या वतीने झालेला हा सोहळा ऐतिहासिक म्हणावा लागेल. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने पंतप्रधानांचा गौरव करण्यात आला. पंतप्रधानांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात लोकमान्य टिळकांनी बजावलेली भूमिका तपशिलाने उलगडून दाखवीत भारताच्या या थोर सुपुत्राला आदरांजली अर्पण केली. टिळक पुरस्कार स्वीकारताना लोकमान्यांच्या विचारांचा त्यांनी केलेला जागर उपस्थितांना भारावून टाकणारा आणि त्याचवेळी नवी प्रेरणा देणारा होता. टिळकांशी थेट संबंधित असलेल्या हिंद स्वराज्य संघाचा पुरस्कार आपल्यासाठी अनमोल आहे, अशी भावना व्यक्त करतानाच त्यांनी, या पुरस्काराने आपल्यावरील जबाबदारी वाढल्याचे सांगितले. अतिशय प्रतिष्ठेचा हा पुरस्कार देशातील १४० कोटी भारतीयांच्या चरणी अर्पण करत असल्याचे सांगतानाच पुरस्काराचा एक लाखाचा निधी 'नमामी गंगे' प्रकल्पासाठी देण्याची त्यांची घोषणा सर्वांचे मन जिंकणारी ठरली.

अनेक पैलूंना उजाळा

भारताच्या इतिहासात लोकमान्य टिळकांचे असलेले महत्त्व काही मोजक्या घटना अथवा काही शब्दांमध्ये मांडणे अशक्य असल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले. ती सामान्यांची, साहित्यिकांची, संशोधकांची, इतिहासकारांची, विद्वानांची प्रातिनिधिक भावना आहे! सूर्याप्रमाणे कायम प्रकाशमान असणार्या टिळक युगाला विशिष्ट शब्द, काळ यांच्या मर्यादेत बसविताच येत नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात टिळकांच्या काळात आणि नंतर देखील जे - जे नेते अथवा क्रांतिकारक आले त्या प्रत्येकावर लोकमान्यांचाच प्रभाव होता, हे पंतप्रधानांनी नि:संदिग्ध शब्दात नोंदविले. ब्रिटिशांनी आपली सत्ता कायम राखण्यासाठी ज्या - ज्या भ्रामक संकल्पना रुजविल्या त्या लोकमान्यांनीच दूर केल्या आणि खर्या अर्थाने भारतीय नागरिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सिद्ध झाले, याकडे पंतप्रधानांनी लक्ष वेधले. भारतीय नागरिक स्वातंत्र्य मिळविण्याच्या योग्यतेचे नाहीत, हा हीनभाव रुजविणार्या इंग्रजांच्या साम्राज्यात लोकमान्यांनी केलेली स्वराज्याची सिंह गर्जना देशाची दिशा बदलणारी ठरली, हे ऐतिहासिक वास्तव मोदी यांनी अधोरेखित केले. सांस्कृतिक परंपरा अभिमानाचा विषय आहे, हे सांगून भारतीयांचे आत्मभान टिळकांनीच जागृत केले. महासागराएवढ्या टिळकांच्या जीवनातील एका महत्त्वाच्या पैलूचा पंतप्रधानांनी आवर्जून उल्लेख केला. व्यवस्था निर्माण करून संस्थांची उभारणी करणे, संस्थांच्या उभारणीतून व्यक्ती घडविणे आणि व्यक्तींपासून राष्ट्रनिर्मिती, या टिळकांच्या कार्यशैलीवर मोदींनी भाष्य केले. टिळकांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय देत त्यांनी उभ्या केलेल्या संस्था आजही कार्यरत आहेत, हे सांगताना त्यांनी अखंड सुरू असलेल्या या वर्तमानपत्राचा, आपल्या 'केसरी'चा कौतुकाने उल्लेख केला! 'केसरी'वर प्रेम करणार्या प्रत्येकाच्या भावना यामुळे उचंबळून आल्या यात नवल नाही. देशभर टिळकांचा उल्लेख 'भगवान टिळक' या संबोधनाने केला जात असे. टिळकांप्रति सर्वसामान्यांचे प्रेम किती होते हे सांगताना आणि गुजरातशी असलेला त्यांचा ऋणानुबंध उलगडताना पंतप्रधान मोदी यांनी अहमदाबाद येथे त्यांच्या स्वागतासाठी त्याकाळी चाळीस हजार नागरिकांची प्रचंड गर्दी झाली होती, ही आठवण सांगितली. त्या गर्दीत सरदार वल्लभभाई पटेलही होते, इंग्रजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी पुढच्या काळात व्हिक्टोरिया राणीच्या नावाने असलेल्या बागेत 'भारतीय असंतोषा'च्या जनकाचा पुतळा बसविला, याची आठवण पंतप्रधानांनी दिल्यावर सर्व उपस्थितांनी केलेला टाळ्यांचा कडकडाट थांबण्याचे नाव घेत नव्हता. लोकमान्यांचा आशीर्वाद आणि त्यांचे विचार यातूनच समर्थ भारताचे स्वप्न पूर्ण होईल, हे पंतप्रधानांचे शब्द देशवासीयांना कायम कृतिशील ठेवतील, यात शंका नाही.

# सुराज्यासाठी झटणाऱ्या मोदींचा सन्मान...



ब्रिटिश राजवटीपासून देशाला मुक्त करायला हवे हे जाणून त्यासाठी लढा उभारणारे बाळ गंगाधर टिळक हे स्वराज्याचे पहिले आणि प्रबळ पुरस्कर्ते होते. ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख जहालवादी नेते होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' या त्यांच्या प्रतिज्ञेसाठी ते ओळखले जात. स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी लाल-बाल-पाल या त्रिकुटांपैकी ते एक होते. टिळकांचे बिपिन चंद्र पाल, लाला लजपत राय, अरबिंदो घोष, व्ही. ओ. चिदंबरम पिल्लई आणि मुहम्मद अली जिना यांच्यासह अनेक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस नेत्यांशी घनिष्ट संबंध होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात लोकमान्य टिळकांची भूमिका, त्यांचे योगदान हे सर्व शब्दांत मांडता येणार नाहीत. टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले नेते होते. विशेष म्हणजे ब्रिटिश अधिकाऱ्यांनीच त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले होते, तर जनतेने त्यांना 'लोकमान्य' ही पदवी बहाल केली. महात्मा गांधींनी त्यांना आधुनिक भारताचा निर्माता असे म्हटले होते. अशा या महान लोकनायकाच्या नावाने लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' देण्यात येतो.

ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांना १९८३ मध्ये पहिला पुरस्कार प्रदान करून लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची(ढळश्रश्ररज्ञ-रीव) सुरुवात झाली. त्यानंतर गोदावरी परुळेकर, इंदिरा गांधी (मरणोत्तर), श्रीपाद अमृत डांगे, अच्युतराव पटवर्धन, खान अब्दुल गफार खान (मरणोत्तर), अटलबिहारी वाजपेयी, टी. एन. शेषन, डॉ. रा. ना. दांडेकर, डॉ. मनमोहन सिंग, डॉ. आर. चिदम्बरम, डॉ. विजय भटकर, शरद पवार, आचार्य बाळकृष्ण, डॉ. के. सिवन, बाबा कल्याणी, सोनम वांगचूक, डॉ. सायरस पूनावाला आणि डॉ. टेस्सी थॉमस आदी मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी १ ऑगस्ट रोजी टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील कार्यक्रमात यंदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रतिष्ठेचा ४१ वा लोकमान्य टिळक पुरस्कार लोकमान्यांचे पणतू दीपक टिळक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये भाजप आणि मोदी राजवटीचे कट्टर वैचारिक विरोधक शरद पवार हेदेखील उपस्थित होते. गेल्या काही दिवसांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेली फूट आणि बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर हे नेते काय बोलणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. पण पवार आणि मोदी यांनी कोणताही राजकीय अभिनिवेष यावेळी आड येऊ दिला नाही. त्यामुळे भल्याभल्यांचे आडाखे चुकले असेच म्हणावे लागेल.

पंतप्रधानपदावर असताना 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करून गौरविले जाणारे नरेंद्र मोदी हे पहिले पंतप्रधान ठरणार आहेत. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना हा पुरस्कार मरणोत्तर प्रदान केला होता, तर डॉ. मनमोहन सिंग आणि अटलबिहारी वाजपेयी यांना ते पंतप्रधान होण्यापूर्वी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात लोकमान्यांचा सिंहाचा वाटा होता. तर देश स्वतंत्र झाल्यावर आता देशात सुराज्य आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अहोरात्र झटत आहेत. 'सबका साथ, सबका विकास' हे ब्रिद सोबत घेऊन सबका विश्वास प्राप्त करण्यात मोदी यशस्वी ठरलेत.

हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या कार्याची पोहोचपावती आहे. जगगरात मोदींचे नाव आदराने घेतले जाते. कोणी त्यांचा ऑटोग्राफर घेतात, तर कोणी सोबत फोटो काढून घेतात. अमेरिकेचे राष्ट्रपती जो बायडेन हे तर त्यांना ग्लोबली पॉवरफुल्ल म्हणतात. अमेरिकेबरोबरच, रशिया, फ्रान्स, जपान, ब्रिटन या देशांबरोबरच आखाती देश असोत सर्व देशांसोबत भारताचे संबंध अधिक दृढ झाले आहेत. कोरोना संकटकाळात भारताने वैज्ञानिकांवर विश्वास दाखवला, 'मेड इन इंडिया'वर भर देत लस बनवली. ही लस अनेक देशांना पुरविण्यात आली. कित्येकांचे प्राण वाचविण्यात आले. या काळात योग्य आणि तत्पर निर्णय घेऊन फार मोठी संभाव्य हानी टाळण्यात मोदींना यश आले. त्यामुळे कोरोनाची लस तयार करण्यात पुण्याचे महत्त्वाचे योगदान असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी नमूद केले.

भारताला आत्मनिर्भर करण्याचा नारा देत मोदींनी अनेकांना आत्मनिर्भर होण्यास मदत केली. 'योग्य रस्ता येण्याची वाट बघण्यात आपण दिवस घालवतो. मात्र आपल्याला याचा विसर पडतो की, रस्ते हे वाट बघण्यासाठी नाहीत, तर चालण्यासाठी असतात', असे लोकमान्य टिळक म्हणत. त्यांचा हाच उपदेश मोदींनी आत्मसात केला आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे त्यांनी सुरू केले आहे. महाराष्ट्राच्या पुण्यभूमीत येण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य समजतो, अशी मराठीतूनच भाषणाची सुरुवात करताना त्यांनी पुणेकरांची वाहवा मिळवली. विशेष म्हणजे लोकमान्य टिळक म्हणजे स्वातंत्र्याच्या इतिहासाच्या माथ्यावरचा टिळा आहे. त्यांच्या नावाने पुरस्कार मिळाल्याने माझी जबाबदारी कैक पटीने वाढली असल्याचे नमूद करून हा राष्ट्रीय पुरस्कार मोदी यांनी १४० कोटी भारतीयांना समर्पित केला. तसेच तुमच्या सेवेत मी कुठलीही कसर ठेवणार नाही, अशी ग्वाही देखील मोदींनी देशवासीयांना दिली. त्याचवेळी पुरस्काराची १ लाखांची रक्कम त्यांनी 'नमामे गंगे' या योजनेसाठी देत असल्याचे जाहीर केले. मोदी यांनी यावेळी महाराष्ट्राच्या भूमीला मी कोटी कोटी वंदन करतो, असे म्हणत मराठीत आपल्या भाषणाची सुरुवात करताच पुणेकरांनी जोरदार टाळ्या वाजवत त्यांचे कौतुक केले. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य म्हणजेच स्वातंत्र्य प्राप्तीसाठी जीवन व्यतीत केले, तर दुसऱ्या बाजूला पंतप्रधान मोदी हे देशात सुराज्य आणण्यासाठी झटत आहेत. त्यामुळे प्रतिष्ठेच्या लोकमान्य टिळक पुरस्कारासाठी मोदी यांची निवड सर्वार्थाने योग्यच म्हणायला हवी.

# पुनर्विवाहांचे प्रमाण वाढवणे ही सामाजिक गरज!

समाजात झपाट्याने वाढत चाललेले घटस्फोटांचे प्रमाण, आजही मुलं-बाळं झाल्यावर वैधव्य आलं तर दुसरा विवाह कसा करावा, मुलांना कोण स्वीकारणार या चिंतेत विधवा म्हणून आयुष्य एकाकी घालवण्याचा निर्णय घेणाऱ्या महिला, स्वतंत्र राहून पती विरोधात वर्षानुवर्षे कोर्टात केस लढत असलेल्या एकट्या अथवा मुलांसोबत वेगळ्या राहणाऱ्या महिला, अथवा अन्य कोणत्याही प्रापंचिक, सांसारिक, कौटुंबिक कलहामुळे, मतभेदामुळे, वैचारिक वादांमुळे एकट्या राहणाऱ्या महिलांची वाढत चाललेली संख्या अशा महिलांसाठी तसेच समाजासाठी देखील अतिशय त्रासदायक ठरत आहे. कुठेही, कोणत्याही कारणास्तव एकटी एकाकी आयुष्य जगणारी महिला दिसली की समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतोय हे सातत्याने जाणवत असते. एकाकी अथवा मुलाबाळांना सोबत घेऊन आयुष्य जगणारी महिला आर्थिक दृष्टीने स्थिर असली, कमवती असली, हुशार आणि बुद्धिमान असली, नोकरी-व्यवसायात यशस्वी असली तरीही समाज तिला दुय्यम वागणूक देत असतो. अशा महिलांचा पुरुष गैरफायदा घेतो असे बोलले जाते. पण फक्त पुरुषांना यामध्ये दोष देण्यात अर्थ नाही.

स्त्रीकडे स्वतःचा हक्काचा नवरा सोडून इतर सगळं काही असलं तरीही ती समाजासाठी एक कोडं असते. यात पूर्णतः समाजाची चूक आहे असे म्हणणे पण योग्य नाही, कारण आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीचा आढावा घेतला तर जिथे कुठे विवाहबाह्य संबंधांचा प्रश्न उपस्थित झालेला दिसतो, त्याठिकाणी पुरुषाला अनैतिक संबंध ठेवण्यासाठी सहजरीत्या उपलब्ध झालेली स्त्री ही बहुतांश वेळा घटस्फोटिता, विधवा, अविवाहित अथवा पतीपासून कोणत्याही कारणास्तव लांब राहणारी असते.

समाजात थोर विचारवंतांनी महिलांसाठी जो पुनर्विवाहाचा(शिशींीळरसश) कायदा केला, द्वितीय विवाहाला परवानगी दिली गेली त्यामागे त्यांचा अतिशय दूर दृष्टिकोन होता हे आज जाणवते. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहचा कायदा होऊन देखील आजही त्याची पुरेपूर अंमलबजावणी होताना दिसत नाही. घटस्फोटित महिलांना सुद्धा कायदेशीर फारकत झाल्यावर दुसरा घरोबा करण्याचा पूर्ण हक्क आहेच. याप्रसंगी अपत्याचं काय करायचं याची देखील कायदेशीर तरतूद आहे. या कायद्यामागे मुख्य उद्देश हाच आहे की विधवा स्त्री, घटस्फोटिता स्त्री उर्वरित आयुष्यात देखील सुरक्षित राहावी, तिला हक्काचा जोडीदार, हक्काचं घर मिळावं, एकटेपणामुळे तिचं कुठेही वाकडं पाऊल पडू नये, तिच्या चरित्र्याला कलंक लागू नये, तिच्या मुलाबाळांची आबाळ होऊ नये आणि हे जाणकारांनी हेरल होते. तरीसुद्धा आज ही समाजात मनमोकळेपणाने पुनर्विवाह करणे, तशी इच्छा दर्शवणे, पुनर्विवाह केल्यास सगळ्यांनी आनंदाने ते स्वीकारणे, महिलांनी स्वतःच त्यासाठी पुढाकार घेणे, पुरुषांनी पण तयारी दर्शवणे याचे प्रमाण अत्यल्प आहे.

शारीरिक, भावनिक गरजा भागविण्यासाठी जर स्त्रीला पुरुषांची गरज अपेक्षित आहे, तर कोणत्याही विवाहित पुरुषाच्या आयुष्यात विष कालवून, त्याला स्वतःकडे आकर्षित करून, त्याला त्याच्या हक्काच्या पत्नीशी प्रतारणा करायला भाग पाडणे योग्य नाही. कोणाचा संसार मोडून स्वतःच्या अपेक्षा पूर्ण करण्यापेक्षा आणि स्वतःला सुद्धा असुरक्षित, बेभरवशाच्या, बेईज्जत करणाऱ्या बेनाम नात्यात गुंतवून घेण्यापेक्षा अशा स्त्रीने वेळेत तातडीने पुनर्विवाह करून उर्वरित आयुष्य सत्कारणी लावणे योग्य राहील.

अनेक घटस्फोटित, विधवा महिलांना ही भीती असते की दुसरे लग्न केले, तर दुसरा पती म्हणून आयुष्यात येणारा पुरुष आपल्या मुलांना स्वीकारेल का? त्याच्या घरातील लोकं आपल्याला बरं पाहतील का? आपल्याला, मुलांना तो चांगली वागणूक देईल का? त्याची देखील पहिली मुलं-बाळं स्वीकारून सगळा ताळमेळ घालणे आपल्याला जमेल का? आपली मुलं नवीन व्यक्तीला बाप म्हणून स्वीकारतील का? स्वीकारलं तरी त्यांचं नातं शेवटपर्यंत निकोप राहील का? त्याची मुलं आपल्याला मनापासून आई म्हणतील का? सख्ख, सावत्र नातं निभावायचं कसे, त्यात भेदभाव येणारच, भविष्यात काही कमी-जास्त झाले, हेही लग्न नाहीच टिकले, तर आपल्या पाठीमागे कोण उभे राहणार?

याव्यतिरिक्त आधीच्या सासरकडून मिळणारी मालमत्ता, तेथील अधिकार अबाधीत ठेवणे, माहेरील हक्क सुद्धा न सोडणे, दुसऱ्या विवाहानंतर मिळणारा मालकीहक्क कसा असेल, किती असेल, स्वतःच्या मुलांच्या नावावर होणारी प्रॉपर्टी, स्वतःच्या मुलांचे कायदेशीर हक्क, दुसऱ्या विवाहात आपली फसवणूक झाली तर? यांसारख्या असंख्य प्रश्नांना तोंड देण्यापेक्षा कोणत्याही पर पुरुषाशी आपल्या गरजेपुरते, तात्कालिक, शारीरिक समाधानापुरते आपल्याला हवं ते मिळण्यापुरते संबंध ठेवून उर्वरित आयुष्य असेच घालवणे महिला पसंत करतात. यातूनच विवाहबाह्य, अनैतिक संबंधांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. आपण आपल्यासाठी, आपल्या मुलांसाठी आपल्याला सुरक्षित, खात्रीशीर, शाश्वत वाटते नाही म्हणून पुनर्विवाह टाळतोय, पण त्यामुळे अनेक विवाहित पुरुषाचा संसार उद्ध्वस्त होतोय किंवा होऊ शकतोय हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे. जेव्हा आपल्याला वाटते आपली मुलं दुसऱ्या पुरुषाला वडील म्हणून स्वीकारतील का? तेव्हा हाही विचार होणे आवश्यक आहे की, आपली हिच मुले आपले अनैतिक वागणं कसे स्वीकारतील? अशी बिनबुडाची नाती मुलांना कळल्याशिवाय राहतात का? जेव्हा आपल्याला वाटते, दुसऱ्या पतीच्या घरचे आपल्याला स्वच्छ मनाने स्वीकारतील का? तेव्हा हे पण लक्षात घ्यावे की, आपण ज्या पुरुषाशी अनैतिक संबंध ठेवून आहोत, त्याच्या घरात पण आपल्याला कोणी स्वीकारून मानसन्मान देणार नाहीये. ज्यावेळी आपण हा विचार करतोय की, दुसऱ्या पतीचे मूल आपल्याला, आपल्या मुलांना बर पाहतील का? तेव्हा हा ही विचार होणं आवश्यक आहे की ज्या विवाहित पुरुषाच्या आयुष्यात आपण आहोत त्याची मुलं आपल्यासोबत असलेलं त्याच्या वडिलांचं आणि आपलं अनैतिक, बदनाम नातं म्हणून आपला किती तिरस्कार करत असतील किंवा करतील? त्यांनी आपला केलेला अपमान, आपल्या मुलांना वापरलेले शब्द आपल्याला सहन होतील का?

तसेच समाजातील घटस्फोटित पुरुष, विदुर, अविवाहित पुरुष यांनी तसेच त्यांच्या घरातल्या मंडळींनी सुद्धा अशा महिलांना मोठ्या मनाने स्वीकारणे, त्यांच्या मुलांची जबाबदारी घेणे, त्यांना समाजात कायदेशीर पत्नीचा दर्जा देणे अपेक्षित आहे. जोपर्यंत एकाकी असलेले स्त्री आणि पुरुष एकमेकांना नैतिक मार्गाने आणि कायदेशीर पती-पत्नी म्हणून स्वीकारत नाहीत तोपर्यंत समाजातील चुकीच्या पद्धतीने सुरू असलेल्या रिलेशनशिप, स्त्री-पुरुषाचे अनधिकृत नातेसंबंध, एकमेकांना गरजेसाठी वापरण्याची वृत्ती, विवाहबाह्य संबंधातून उसवत चाललेली कौटुंबिक, सामाजिक घडी, अनेक चांगले संसार उद्ध्वस्त होण्याचे प्रमाण कमी होणार नाही. एकाकी असलेल्या स्त्री आणि पुरुष दोघांच्या पहिल्या अपत्यांना दुसरे हक्काचे आई-बाबा मिळणे, त्यांचं भविष्य सुरक्षित होणे, त्यांना समाजात ताठमानेने जगता येणे पुनर्विवाहामुळे शक्य होईल. वर्षानुवर्षे एकटं राहून, कोणाच्याही आश्रयाला राहून, कोणत्याही चुकीच्या भ्रमात, खोट्या कल्पनेत, स्वप्नात जगून आपला कोणालाही शारीरिक, भावनिक, मानसिक, आर्थिक गैरफायदा घेऊ देणे, एखाद्याचे वापरण्याचे साधन होणे, एखाद्यासाठी चेंज म्हणून, एन्जॉय व्हावा म्हणून स्वतःचा आत्मसन्मान गहाण ठेवणे यापेक्षा महिलांनी पुनर्विवाह करुन कायमच सेटल होणं वैयक्तिक, सामाजिक दृष्टीने योग्य आहे असे वाटते.

**- फॅमिली काऊन्सलिंग: मीनाक्षी जगदाळे**

## शब्दकोडे-१३८



आडवे शब्द - १. पोलिस ६. आत्याचा मुलगा ९. वजनदार १०. फळातील द्रव ११. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा १५. क्रिकेटमधील धाव १६. प्रतिबंध, विरोध १८. तमाशा १९. तोंडाचा एक भाग २१. रम्य २२. वेडावाकडा २४. मातीचा कण २५. चर्चा २७. भारतात वास्तव्य करणारे तिबेटी धर्मगुरु २८. शेतकरी (हिंदी) ३०. हाडांचा सापळा ३२. प्रत्येक दिवशी ३४. धमकी, श्वास ३६. व्रत, नियम ३८. चेहरा ४०. रामाच्या चरित्रावरील नाट्यप्रयोग ४२. शंकर ४४. मृत्यूनंतर शरीराचे केलेले दान ४६. नवरसातील एक रस ४७. विनंती ४९. आनंद ५०. ट्रीपला मराठी शब्द ५२. अजगर ५३. काळ्या तोंडाचे माकड ५५. सत्त्व ५७. शहाणा, चलाख ५९. घरोघर ६०. श्रीरामाचे स्तोत्र ६२. भितीवरून सरपटणारा प्राणी ६३. घर ६४. महिना ६५. समशेर, ढाल ---- ६७. चालू दिवस ६८. लहानसहान ७१. अभिनेता ७२. पंख ७३. वर्ण ७५. गाणे ७७. नोकरी करणारा ८०. जरीने भरलेले वस्त्र ८१. मांडणी, सजावट ८२. भीतीने होणारी थरथर ८३. पुष्पराग, सत्त्व, तमबरोबरचा तिसरा गुण

उभे शब्द - १. मावळ्यांची युद्धातील प्रोत्साहनपर घोषणा २. दिवस ३. जावई (हिंदी) ४. दारूचा एक प्रकार ५. यावर्षी (ग्रा.) ७. तीन दिवसाचे फूल ८. अवधान, लक्ष ९. भारताचे पहिले पंतप्रधान १२. चटकन १३. धट्टाकट्टी १४. धोबी १७. जास्तीत जास्त व कमीत कमी २०. हिंदीत मोठा २१. मला, वरचा माळा २३. संध्याकाळ २४. एखाद्याच्या बाजूने बोलणे, वकिली करणे २६. त्याप्रमाणे २९. मोठी नदी ३१. डावखोरा ३३. चित्तथरारक ३५. स्वत:ला ३७. मृत्यू ३९. रावण ४१. राजवाडा ४३. जल ४४. शरीर ४५. धमनी ४६. हाताचा तळवा ४७. लग्नसोहळा ४८. आशीर्वाद ५१. पैगंबर, राजा यांच्या नावापुढील बहुमानाचा शब्द ५२. पूर्ण भेदून जाणे ५४. नाशिकजवळून वाहणारी नदी ५६. मध्यम प्रमाण ५८. मुलगा, तनय ६१. धुणे ६४. मत्स्य ६६. मार्गक्रमण ६७. नौदल ६८. भाकरीचे एक धान्य ६९. खबदाड ७०. चषक ७२. अन्य, दुसरा ७४. मगज ७६. पान, पाकळी, तुकडी ७८. रचलेले कारस्थान ७९. निद्रा, झोप

### शब्दकोडे १३७ चे उत्तर

आडवे उत्तर - १.रखवालदार ६.मजल दरमजल १२.सर १३.गरजवंत १४.वरण १५.लालन १७.पात १८.लता २०.शतक २२.जबरदस्त २४.माय २५.आभाळ २७.कटाप २८.बाठ २९.मका ३०.पळस ३१.सरसावणे ३३.उदर ३४.रसद ३६.दलदल ३७.दामोदर ३८.रत ४०.पारवा ४१.फार ४३.भारतीय ४५.डरपोक ४८.हत्ती ४९.आवा ५१.कळकळ ५२.नर ५३.अंकगणित ५५.आळस ५६.उद्धव ५८.मारा ५९.डर ६१.सगा ६२.मदन ६५.सम ोरासमोर ६८.सागर ७०.तवा ७१.जबाबदारी ७२.कालहरण ७४.अदाकार ७५.ताबडतोब ७६.खेटर ७७.गे ७८.पण

उभे उत्तर - १.रसना २.खर ३.लगत ४.दार ५.रजनी ६.मतलब ७.लव ८.दरखास्त १०.जलाशय ११.ललत १६.नकलाकार १७.पातळसर १९.तारा २१.मकरंद २२.जप २३.दर २४.माठ २५.आपपराभव २६.भाळ २८.बाणेदार २९.मदर ३१.सलवार ३२.रद ३३.उदबत्ती ३५.समय ३६.दरड ३९.तर ४२.सांबार ४४.तीरकमान ४६.पोकळ ४७.कळस ४९.आणि ५०.वातड ५२.नवसागर ५४.गरा ५६.उगा ५७.कमतरता ६०.रसदार ६१.सरकारी ६३.दवा ६४.बोंबाबोंब ६६.मोरी ६७.सरदार ६८.साहस ६९.रणरण ७३.आड ७४.अट

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# सेवानिवृत्ती वेतन १ ऑगस्ट रोजीच बँक खात्यावर जमा

## सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाची तत्परता

**नाशिक । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेतील ४११४ सेवा निवृत्ती वेतन धारकांचे निवृत्तीवेतन हे महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात करण्याचे निर्देश दिले असता सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, जिल्हा कोषागार व सर्व तालुक्यातील गट विकास अधिकारी यांनी तत्परतेने कार्यवाही करत १ तारखेला निवृत्तीवेतन हे सेवा निवृत्तीवेतन धारकांच्या खात्यावर जमा करण्यात आले, निधी प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक महिन्यात अशाच पद्धतीने कार्यवाही करत प्रत्येक महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात निवृत्तीवेतन अदा करण्यात येईल.**



**-आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नाशिक**

नाशिक जिल्हा परिषदेतील सामान्य प्रशासन विभागांतर्गत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांना ऑगस्ट महिन्याच्या पहिल्याच दिवशी जुलै महिन्याचे निवृत्तीवेतन अदा करण्यात आले. नाशिक जिल्ह्यातल्या १५ तालुक्यातील ४११४ सेवानिवृत्तीवेतन धारकांना १६ कोटी रुपये इतक्या रकमेचे निवृत्तीवेतन जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीमद्वारे अदा करण्यात आले.

सेवानिवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतन वेळत करण्यासंदर्भात पालकमंत्री दादाजी भुसे यांनी मागील महिन्यात बैठक घेतली होती. त्याचबरोबर राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी देखील निवृत्तीवेतन हे वेळेवर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सेवा निवृत्ती वेतन वेळेत देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शिक्षक संवर्ग वगळता सर्व १५ तालुक्यातील ४११४ सेवा निवृत्तीवेतन धारकांचे वेतन हे १ ऑगस्ट रोजीच अदा करण्यात आले. दि. २६ जुलै रोजी शासनाकडून सेवानिवृत्तीवेतन अदा करण्यासाठी अनुदान प्राप्त झाले, २७ तारखेला सामान्य प्रशासन विभागाकडून वित्त विभागास देयक मान्यतेने देयक जिल्हा कोषागारात सदर करण्यात आले. जिल्हा कोषागारातून दि. २८ रोजी निधी हा वर्ग करण्यात आला. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाकडून वित्तप्रेषणद्वारे वित्त विभागाकडून १५ तालुक्यातील गट विकास अधिकाऱ्यांना वितरीत करण्यात आला. त्यानुसार प्रत्येक तालुक्यातील गट विकास अधिकारी यांनी सर्व देयके तपासून दि. ३१ जुलै रोजीच जिल्हा परिषद फंड मॉनिटरिंग सिस्टीमद्वारे अदा केले. वित्त विभागात वरिष्ठ सहायक लेखा रामेश्वर बादड, सहायक लेखाधिकारी पूनम भांबरे, लेखाधिकारी रमेश जोंधळे व मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश बच्छाव यांनी तातडीने देयके ही जिल्हा कोषागारात सदर केली.

---

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे कोर्टात**

दि.कि.अ.नं. २२०/२०२३

सिंधुबाई दगा देसले ....अर्जदार

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....जाबदेणार**

## जाहिर नोटीस

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे कोर्टात दिनांक १४/०७/२०२३ रोजी दि कि. अर्ज नं. २२०/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. वरील अर्ज अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्ट अन्वये मयत यमुनाबाई गजमल देवरे व मयत गजमल तानाजी देवरे यांचे वारस घोषीत होउन मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करता पुढील चौकशीची ता. २/९/२०२३ रोजी निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस हितचिंतक वगैरे संबंधीतांना कळविण्यात येथे की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही, तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाया तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोर्टाचे सहिशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ:- साक्री

दिनांक :- २/०८/२०२३

**क. लिपीक** (शिक्का) **सहा.अधिकारी**
**दिवाणी न्यायालय साक्री** **दिवाणी न्यायालय साक्री**

---

**प्रोसेस जमा ॲड. मनोजकुमार डी. खैरनार, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २३९/२०२३**

ज्बेदाबी रफिक (शहा फकिर) व इतर,
उ.व. - ७७, धंदा--घरकाम,
राहणार-दहिवेल ता.साक्री, जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

मयत - कै. रफिक बिस्मिल्ला शहा (फकिर ), -
(मृत्यू दिनांक - १५/०८/२०२०)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक २८/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. रफिक बिस्मिल्ला शहा (फकिर) याचे दिनांक १५/०८/२०२० रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. जुबेदाबी रफिक शहा ( फकिर), २. नुरमोहम्मद रफिक शहा (फकिर), ३. लियाकत रफिक शहा (फकिर ), ४. सुलतानाबी अब्दुल सत्तार, ५. काफिया मुनाभाई शहा ( फकिर), ६. जमील रफिक शहा ( फकिर ),

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १८/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री

दिनांक- ०१/०८/२०२३ आदेशावरुन,

**क. लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय,साक्री**

---

**ॲड. अतुल अरूण जगताप, धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे.२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९४१/२०२३**

श्रीमती. कल्पना प्रदिप पाटील ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

कै. प्रदिप उखाजी पाटील (मयत) .....**जाबदेणार**

ज्याअर्थी की, कै. प्रदिप उखाजी पाटील हे अर्जदार नं. १ श्रीमती. कल्पना प्रदिप पाटील यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २. कुमारी. राजेश्वरी प्रदिप पाटील याचे पिता आहे तसेच ३. अनघ प्रदिप पाटील याचे पिता आहे. कै. प्रदिप उखाजी पाटील यांचे दि. २४/०४/२०२३ रोजी मौजे धुळे ता. जि. धुळे येथे निधन झालेले आहे, कै. प्रदिप पाटील हे दिनांक ३०/११/२०२२ रोजी धुळे येथे शासकिय सेवानिवृत्त झाले त्यांना महाराष्ट्र शासना कडुन पेन्शन लागु झालेली आहे, सदर पेंन्शन त्यांचे वारसांना पेन्शन लागु करण्यासाठी तसेच शासकीय व निमशायकीय विविध कार्यालयातील कामांन करिता वारस तक्त्याची/ दाखल्याची अर्जदार नं. १ ते ३ यांना नितांत तातडीची गरज आहे त्यामुळे अर्जदार नं. १ व ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. १३/०९/२०२३ रोजी मे. कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

धुळे

दिनांक - ०१/०८/२०२३

आदेशावरुन,

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

---

**प्रोसेस जमा ॲड. श्री. विकास एस. माळी, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २२८/२०२३**

वहीद अली इस्लाम अली सैयद व इतर,
उ. व. - ५४, धंदा - व्यापार,
राहणार- निजामपूर, रेहमत नगर, ता.साक्री, जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

मयत - कै. इस्लाम अली बशिर अली सैय्यद -
(मृत्यू दिनांक - ३१/०१/२०१९)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक १८/०७/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. इस्लाम अली बशिर अली सैय्यद याचे दिनांक ३१/०१/२०१९ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी

त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१ . वहीद अली इस्लाम अली सैय्यद, २. हसन अली इस्लाम अली सैय्यद, ३. आबिद अली इस्लाम अली सैय्यद, ४. शाकीर अली इस्लाम अली सैय्यद, ५. शब्बीर अली इस्लाम अली सैय्यद, ६. सजदा बी शेख रफिक, ७. नजमा बी मलक सलाउद्दीन,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०४/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री

दिनांक- ०१/०८/२०२३ आदेशावरुन,

**क. लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय,साक्री**

---

**ॲड.राकेश अशोक मोरे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं.९१३/२०२३**

१.श्रीमती सुनिता प्रकाश पाटील,
२. श्री. दिपक प्रकाश पाटील,
रा. प्लॉट नं. ११४/ ब, सुदर्शन कॉलनी, देवपूर, धुळे,
३. सौ. अश्विनी श्रीकांत शिंदे,
सर्व्हे नं. १८/२, एकता कॉलनी, गणेश मंदिर जवळ, थेरगांव, ता. मुळशी, जि.पुणे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

कै. प्रकाश मुरलीधर पाटील .....**मयत**

कायदेशिर वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी
(Legal Heirship Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ३ यांनी मयत प्रकाश मुरलीधर पाटील यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. सह दिवाणी न्यायाधिश सो. क स्तर कोर्ट नं. १ यांचे कोर्टात दिनांक ०५/०९/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वतः मे. कोर्टात किंवा वकीलांमार्फत/प्रतिनिधी मार्फत हजर राहुन सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत प्रकाश मुरलीधर पाटील यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन अन्वये वारस दाखला'' (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि. ०१/०८/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

---

**प्रोसेस जमा ॲड. श्री. विकास एस. माळी, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १३४/२०२३**

सौ. निर्मलाबाई दाजभाउ उर्फ राजेंद्र बिलाडे व इतर,
उ. व. - ६०, धंदा-घरकाम,
राहणार-म्हसाळे, ता.साक्री, जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

मयत - कै. दाजभाउ उर्फ राजेंद्र अर्जुन माळी (बिलाडे) - (मृत्यू दिनांक - १२ /०८/२०२१)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, येथे दिनांक २६/०४/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. कै. दाजभाउ उर्फ राजेंद्र अर्जुन माळी याचे दिनांक १२/०८/२०२१ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. सौ. निर्मलाबाई दाजभाउ उर्फ राजेंद्र बिलाडे,
२. श्री. रविंद्र दाजभाउ उर्फ राजेंद्र बिलाडे.
३. श्री. प्रविण दाजभाउ उर्फ राजेंद्र बिलाडे,
४. सौ. भटाबेन लक्ष्मणभाई माळी,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ३०/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री

दिनांक- ०१/०८/२०२३ आदेशावरुन,

**क. लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय,साक्री**

---

**ॲड.देवराम डी. बागुल धुळे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज. क्र. ९०४/२०२३**

१. कल्पेश रमेश निकम उ. वय.: - २३ वर्ष, धंदा :- व्यवसाय
२. मिराबाई रमेश निकम उ. वय.:- ५१ वर्ष, धंदा :- घरकाम
नं. १ व २ रा. शेलारवाडी, विखे नगर, चितोड रोड, धुळे, ता. जि. धुळे.
३. विद्या संदीप सैंदाणे, उ. वय :- २९ वर्ष, धंदा :- घरकाम
रा. अमृतधाम, साई नगर, पंचवटी नाशिक.
४. शितल वाल्मीक बोरसे उ. वय :- २७ वर्ष, धंदा :- घरकाम
रा. दामोदर नगर, मोहाडी उपनगर, धुळे. ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

**आणि**

कै. रमेश भगाजी निकम (मयत) मृत्यु दिनांक ०२/०८/२०२०,
मृत्यु ठिकाण धुळे, ता. जि. धुळे. .....**मयत**

ज्याआर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि. २१/७/२०२३ रोजी दि. कि. अर्ज. नं. ९०४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी कै. रमेश भगाजी निकम (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याने त्यांना तसा कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.०५/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क.स्तर कोर्ट नं. ९, यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस सकाळी ठिक १०:०० वाजता उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे

दिनांक :- ०१/०८/२०२३ आदेशावरुन,

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं. मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**

---

**प्रोसेस जमा ॲड. श्री. विकास एस. माळी, साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. १६८/२०२३**

सौ. गोकुळबाई अभिमन जाधव व इतर,
उ. व .-६०, धंदा-घरकाम,
राहणार- शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही .....सामनेवाला**

मयत - कै. भटा कौतिक माळी ( भदाणे) -
(मृत्यू दिनांक - १९/१०/१९८६)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दिनांक १६/०६/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, कै. भटा कौतिक माळी (भदाणे) याचे दिनांक १९/१०/१९८६ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. सौ. गोकुळबाई अभिमन जाधव, २. सौ. तुळसाबाई रतन सुर्यवंशी, ३. सौ. वंदना कैलास वाघ, ४. श्रीमती. सरला संजय भदाणे, ५. सौ. उज्वला भरत निकुंभ, ६. सौ. माया रविंद्र सोनवणे, ७. रुपाली अनिल शेवाळे,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय, निमशासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साकी येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक ०५/०९/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-साक्री

दिनांक ०१/०८/२०२३ आदेशावरुन,

**क. लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय,साक्री**

---

**प्रोसेस जमा ॲड.पांडुरंग आर. पीसे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९३८/२०२३**

१) नामदेव भाऊराव बिलाडी (माळी) उ. व. ६१ वर्षे, धंदा- शेती
२) माधवराव भाऊराव बिलाडी (माळी) उ.व.५६ वर्षे, धंदा- शेती
३) राजेंद्र भाऊराव बिलाडी (माळी) उ.व. ५१ वर्षे, धंदा- शेती
नं. १ ते ३ रा. चौगाव, ता. जि. धुळे
४) इंदुबाई बभुता माळी उ.व. ६६ वर्षे, धंदा- घरकाम रा. सुरत
५) जन्याबाई रतन बोरसे उ. व. ६१ वर्षे, धंदा - घरकाम
रा. चौगाव, ता. जि. धुळे
६) मंगलबाई सोमनाथ माळी (मयत) वारस
६- अ) भट् सोमनाथ माळी उ.व. ४०, धंदा - मजुरी
६- ब) ललिता भाऊसाहेब वाल्हे उ.व. ३८ वर्षे, धंदा- घरकाम
६-अ) व ६-ब) रा. वणी, ता. जि. धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कुणीही नाही ... सामनेवाला**

कै. भाऊराव नानाजी माळी .....**(मयत)**
कै. मंगलबाई सोमनाथ माळी .....**(मयत मुलगी)**
कै. सिताबाई भाऊराव माळी .....**(मयत पत्नी)**

बॉम्बे रेग्युलेशन कायदा VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी मयत कै. भाऊराव नानाजी माळी यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि. कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं.८ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे.न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. ०६/०९/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ( यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे,तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थि मे.न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदर कामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै.भाऊराव नानाजी माळी यांचे कायदेशीर वारस म्हणून बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला(Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे.न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे

दि. १/८/२०२३ आदेशावरुन

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे दिवाणी न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### दहशत निर्माण करणाऱ्या गुंडांवर हद्दपारीची कारवाई

**नाशिक ।** शहरात वाढत असलेले गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी मागील काही काळात कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. उपनगर भागात गाड्यांची तोडफोड करून दहशत निर्माण करणाऱ्या टोळीवर मोक्कांतर्गत कारवाईचे आदेश दिल्यानंतर याच परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या दोघा गुंडांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्तालय हद्दीत नागरिकांना मारहाण करून लुटमार, घरावर दगडफेक, वाहनांची तोडफोड, घरफोडी, विनयभंग व दहशत निर्माण करून जनजीवन विस्कळीत करणाऱ्या गुंडावर कारवाई करण्यात आली आहे.

### सुकवद गावातून अल्पवयीन मुलीस पळविले, एकावर गुन्हा

**शिरपूर ।** तालुक्यातील सुकवद येथे राहणाऱ्या १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले आहे. तिला गावातील सचिन मोहन पवार याने काहीतरी फुस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. ही घटना दि. ३० जुलै रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास घडली. मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून संशयीत आरोपीवर सोनगीर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे. एएसआय विजय पाटील तपास करीत आहेत.

# बोरकुंड येथे ९ कोटींच्या विकास कामांचा शुभारंभ

**धुळे । प्रतिनिधी**



बोरकुंड येथील तब्बल ९ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन, इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते करण्यात आले. बाळासाहेब भदाणे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या विविध विकास कामांमुळे बोरकुंड परिसराचा अजून कायापालट होणार असल्याने ग्रामस्थातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. राममा २११- विंचुर - बोरकुंड - नाशिक जिल्हा हद्द (झोडगे) ते राममा ३ या रस्त्यासह अनेक विकासकामे यातुन मार्गी लागणार आहेत.

बोरकुंडचे प्रथम लोकनियुक्त सरपंच बाळासाहेब भदाणे व जि.प.सदस्या शालिनीताई भदाणे यांनी बोरी पट्टयात विकासकामांचा धडाकाच लावला आहे. लाखोंची विकासकामे मार्गी लागली असुन अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. यातच बोरकुंड परिसरातील ९ कोटींच्या कामांचा भूमिपूजन समारंभ नुकताच संपन्न झाला. राममा २११- विंचुर - बोरकुंड- जिल्हा हद्द नाशिक (झोडगे) ते राममा ३ हा रस्ता सुमारे १५ किमी धुळे तालुक्यातुन जातो. हा रस्ता दळणवळण व व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मानला जातो. या रस्ता इंधन बचतीसही पूरक रस्ता मानला जातो. या रस्त्याच्या उपयुक्ततेचा विचार करुन, हा मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्यासह विविध कामांचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. यात ७०२.४९ लक्ष रुपये निधीतून विंचूर- बोरकुंड ते नाशिक जिल्हा हद्द- झोडगेकडे जाणार्या किमी ७/०० ते १५/०० रस्त्याची सुधारणा करणे, गौण खनिज विकास निधी अंतर्गत ३० लक्ष रुपये निधीतून बोरकुंड जि.प. मराठी शाळेकडे जाणारा रस्ता तयार करणे, गौण खनिज विकास निधीतंर्गत बोरकुंड प्राथमिक आरोग्य केंद्रात १५ लक्ष रुपये निधीतून सोयीसुविधा करणे, बोरकुंड येथे गौण खनिज अंतर्गत १५ लाख निधीतून प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत प्रसुतीगृह व शिशुगृह दुरुस्ती करणे, बोरकुंड येथे मग्रारोहयो योजने अंतर्गत १५ लक्ष निधीतून गाव अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरण करणे तसेच ३० लक्ष निधीतून बोरकुंड येथे मग्रारोहयो अंतर्गत, गाव अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे, बोरकुंड येथे दलितवस्ती निधी अंतर्गत गाव १० लक्ष रुपयाचे काँक्रीटकरण करणे, बोरकुंड येथे ९० लाखांचे शेत पानंद रस्ते तयार करणे, तसेच बोरकुंड येथे १५ व्या वित्त (पं. स. स्तर) आयोगातून ७ लक्ष रुपयाचे गाव अंतर्गत काँक्रीटकरण करणे आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी बाळासाहेब भदाणे यांचेसह रतनपुरा गटाचे जि. प. सदस्य प्रभाकर पाटील, धुळे पंचायत समितीचे उपसभापती देवेंद्र माळी, धुळे पंचायत समितीचे माजी उपसभापती नारायण माळी, बोरकुंड सरपंच हेमंत भदाणे, उपसरपंच संजय माळी, रवींद्र पाटील, सुभाष अहिरे, भिमराव माळी, हितेश पारिक, संजय भदाणे, दिनेश माळी, सोसायटी चेअरमन अनिल भदाणे, व्हा. चेअरमन राजेंद्र माळी, अर्जुन माळी, गंगाधर माळी, अशोक पाटील, राजेंद्र माळी, चंद्रशेखर भदाणे, हिरालाल पाटील, दगडू अहिरे, दिगंबर पाटील, कौतिक माळी, रावसाहेब गढरी, वाल्मीक माळी, डी. पी.पाटील, धर्मराज पाटील, शांताराम वाणी, डॉ. रवींद्र नानकर, आनंदा पवार, खंडू वाघ, गुणवंत पाटील, शांतीलाल माळी, अरुण देवरे, भटू पाटील, गंगाधर माळी, भरत भदाणे, दीपक पाटील, बंडू पवार, पंडित आढावे, जितेंद्र जैन, राजेंद्र माळी, शरद पाटील, भीमराव माळी, काशिनाथ माळी, भटू आहिरे, रामदास देवरे, दिगंबर पाटील, धनराज पाटील, भटू पाटील, राजेंद्र मराठे, जिभाऊ पाटील, भरत घोडके, आत्माराम आढावे, दिनेश माळी, लोटन पाटील, भिका माळी, किशोर जाधव, गोरख कठाडे, दोधू पाटील, जयराम माळी, ज्ञानेश्वर माळी, प्रकाश पाचपुते, बाबूलाल पाटील, अरुण वाणी, भरत पाटील, तुकाराम पाटील, दगडू माळी, दादाभाऊ देवरे, कैलास माळी, सुखा माळी, रमाकांत मिस्तरी, कौतिक देवरे, मनोज अहिरे, जितेंद्र माळी रावसाहेब मिस्तरी, भूषण पाटील, भाऊसाहेब पाटील, बापू भोई, नंदाळे येथील नानासाहेब पाटील, दिवाण पाटील, अमोल पाटील, समाधान पाटील, होरपाडे येथील रवींद्र कठाळे, प्रभाकर खुरणे, कुळथे येथील रमेश मराठे, अरुण कव्हाड, वर्धमान कव्हाड, दिनेश रोझ, दादा गवळी, पुरंदास वंजारी, राजू कव्हाड, शरद गायकवाड, सिताने येथील योगेश राजपूत आदी उपस्थित होते. या विकासकामांमुळे बोरी पट्टयाचा अजून कायापालट होणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

# गाडगे बाबांचा वारसा पुढे घेऊन जाऊया: चंद्रकांत मोरे

**समर्थ सेवामार्गाचे स्वच्छता अभियान**

**नाशिक । प्रतिनिधी**



संत गाडगे बाबांनी आपलं आयुष्य समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी खर्ची घातले. स्वच्छता आणि आरोग्याचा मंत्र निरक्षर, अडाणी, अज्ञानी जनतेला देण्यासाठी आयुष्यभर बाबांनी अखंडीत पायपीट केली. गुरुमाऊलींच्या प्रेरणेतून गाडगे बाबांचा हा वारसा आपणास पुढे घेऊन जायचा आहे. त्यासाठी प्रत्येक सेवेकऱ्याने प्रयत्नशील असावे, असे आवाहन समर्थ गुरुपीठाचे महाव्यवस्थापक चंद्रकांत मोरे यांनी केले.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर अंतर्गत आरोग्य अभियानाच्या अंतर्गत त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त परिसर आणि रामकुंड, पंचवटी नाशिक येथे स्वच्छता अभियान, गरजूंना वस्त्रदान, आरोग्य तपासणी आणि मोफत औषधधोपचाराचा संयुक्त कार्यक्रम हाती घेण्यात आला. याप्रसंगी चंद्रकांत मोरे यांनी उपस्थित सेवेकऱ्यांशी संवाद साधताना आवाहन केले.

आपली तीर्थक्षेत्र, मंदिरे ही आपली ऊर्जास्थळें आहेत परंतु आज येथील प्रचंड अस्वछतेमुळे या ऊर्जास्थळांना ग्लानी आली आहे. ही ग्लानी घालविण्यासाठी गुरुमाऊलींच्या आदेशानुसार हे स्वच्छता अभियान सर्वत्र हाती घेण्यात आल्याची माहितीही मोरे यांनी दिली. या अभियानात नाशिक शहर आणि जिल्ह्यातून आलेल्या पाचशे महिला- पुरुष सेवेकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

रामकुंड, कालभैरव मंदिर, सांडवा देवी मंदिर व संपूर्ण गंगाघाट परिसरात एक ट्रॅक्टरपेक्षा अधिक कचरा संकलन करून त्याची विल्हेवाट लावली. उपक्रमाबाबत बोलतांना चंद्रकांत मोरे म्हणाले, महिन्यातील एका रविवारी नियमितपणे सेवेकरी या परिसराची स्वच्छता करीत आहेत. याबरोबरच वस्त्रदान आणि मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार अभियान राबविण्यात आले. गत वर्षाच्या गुरुपौर्णिमेपासून सेवामार्गाच्या या अभियानास प्रारंभ झाला. रविवारी झालेल्या कार्यक्रमात ७२ गरजूंना वस्त्र वाटप करण्यात आले तर १७९ रुग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आला.

# साक्रीत महादेव मंदिराचे भूमिपुजन

**साक्री । प्रतिनिधी**



अधिक श्रावणमासाच्या पवित्र पर्वात साक्री येथील मुकुंदनगर- रमेशनगर ,नागरेनगर परिसरात सर्व शिवभक्तांच्या सहभागाने शंभू महादेव शिवमंदिराचे मोठ्या उत्साहात भूमिपुजन करण्यात आले.

यावेळी परमशिवभक्त व भटके विमुक्त समाज संघटनेचे जेष्ठ नेते अशोक गिरी महाराज, नगरसेविका उषापवार, अनिल पवार, माजी नगरसेविका अँड. पुनम काकुस्ते- शिंदे, माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे संस्थापक जगदिश वाघ, निवृत्त नायब- तहसिलदार के.डी, मोरे, साक्री तालुका मुद्रांक विक्रेता संघटनेचे अध्यक्ष माधवराव पाटील यांचासह मुकुंदनगर रमेशनगर, नागरेनगर मधील शिवभक्त - नागरिक उपस्थित होते. दानशूर शिवभक्तांनी या मंदिर निर्माण कार्यात सढळ हस्ते यथाशक्ती आर्थिक मदत देऊन सहकार्य करावे , असे आवाहन कॉलनीतील सर्व शिवभक्तांनी केले आहे.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था **Admission Open**

**विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे**

NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A

B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.

प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344

प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735, प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

# श्री स्वामी समर्थ माध्यमिक महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**शिंदखेडा । प्रतिनिधी**



येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय शिंदखेडा येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. आर. पाटील होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

शाळेतील शिक्षक हर्षल भामरे यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमानिमित्त वकृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते यात पाचवी ते सातवी लहान गट यात तेरा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व आठवी ते दहावी मोठ्या गटातून पंधरा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. लहान गटातून प्रथम करण देवेंद्र पावरा, द्वितीय माधव गोविंदा पावरा, तृतीय वैशाली अशोक पाटील व तसेच मोठ्या गटातून प्रथम अंजली ज्ञानेश्वर गिरासे, द्वितीय मोहित सुनील बोरसे, तृतीय नम्रता दीपक माळी यांनी बक्षिसे पटकावले. अध्यक्षीय भाषणात डॉ.आर. आर.पाटील यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्याकडून कोणते गुण घेतले पाहिजेत याबाबत मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.आर. आर. पाटील, कार्याध्यक्ष श्री.अनिल पाटील व सचिव उज्वल आर.पाटील यांनी स्पर्धेत विजयी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# उत्तमराव पाटील महाविद्यालयात लो. टिळकांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**दहिवेल । प्रतिनिधी**

येथील उत्तमराव पाटील महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना एकाकाच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक डॉ सुरेश अहिरे,डॉ संजय गवळी,व डॉ एस बी देसले,यांनी प्रतिमा पूजन करून अभिवादन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ योगेश कोरडे यांनी केले. यावेळी प्राध्यापक डॉ अशोक मराठे,डॉ सुनील संदनशिव,डॉ बी आर मोरे,डॉ भोई एस एस,डॉ कारंडे आर व्ही,प्रा जीवन अहिरे,प्रा एस आर बागुल,एल एम पवार,व विद्यार्थी उपस्थित होते प्रल्हाद महाजन यांनी परिश्रम घेतले सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी आभार व्यक्त केले.

# भारताला महासत्ता बनविण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये : डॉ सचिन नांद्रे

**साक्री । प्रतिनिधी**




भारताला विकसित करून महासत्ता बनविण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये असून जी २० युवा संवाद अंतर्गत भारत २०४७ अभियानाच्या अमृत काळातील पंचप्रण चे अवलंबन करून स्वयंसेवकांनी या महत्तम कार्यात आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ सचिन नांद्रे यांनी केले.

युवक व क्रीडा मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली राष्ट्रीय सेवा योजना उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय सेवा योजना कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या समन्वयाने विद्याविकास मंडळाची सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री जि धुळे येथे आयोजित केलेल्या ऋ-२० युवा संवाद भारत २०४७ संमेलनात बोलत होते. सदर संमेलनाची उद्घाटन विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, प्राणीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ लहू पवार प्रसंगी उपस्थित होते. उद्घाटकीय मनोगतात विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांनी युवा म्हणून आपले कर्तव्य बजावत असताना विद्यार्थ्यांनी देशाप्रती आणि समाजाप्रती नेहमी कृतज्ञ रहावे असे मत व्यक्त केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आजच्या युगात विविध कौशल्यपूर्ण ज्ञान संपादन करून स्वयंविकासासोबतच देशाच्या प्रगतीसाठी देखील कार्य करावे असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. संचालक डॉ सचिन नांद्रे यांनी पुढे आपल्या मनोगतात जी-२० या जागतिक संघटनेचे अध्यक्ष पद भारताला लाभणे महत्त्वपूर्ण असून या अंतर्गत भारत २०४७ या महत्वपूर्ण कार्यक्रमाची सुरुवात झाल्याची माहिती दिली. स्वयंसेवकांनी अमृत काळातील पंचप्रण चे अध्ययन करून लोकांपर्यंत ते पोहोचवावेत असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थ्यांना सदर उपक्रमात सहभागी होण्याचे आव्हान केले. सदर कार्यक्रमाचे संचलन ज्योती वाकोडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा सुरेंद्र सिंग मगर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ प्रदीप राठोड, महिला अधिकारी डॉ ज्योति वाकोडे, सहाय्यक अधिकारी प्रा सुरेंद्र सिंग मगर यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक रुंद व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग साो. यांचे कोर्टात**

**फौ.कि.अर्ज. नं. ३२८/२०२३**

जंगलु दिलीप माळीच, उ. व. २१ धंदा मजुरी.
रा.दातर्ती ता.साक्री जिल्हा.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

म. ग्रामसेवक, निबंधक, जन्म-मृत्यू ग्रामपंचायत कार्यालय,
रा.दातर्ती ता.साक्री जिल्हा धुळे .....**सामनेवाला**

जंगलु दिलीप माळीच -( जन्म दि ०८/०५/२००२)

ज्याअर्थी अर्जदार यांनी साक्री येथील मे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. याचे कोटांत दि. २०/०६/२०२३ रोजी फौजदारी कि अर्ज नं. ३२८ / २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधील ९ (३) प्रमाणे जन्माची नोंद करणेबाबत वरील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. कोर्टाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता पुढील चौकशी तारीख २१/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की. याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग सो. यांचे कोर्ट नं. २ या न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून तक्रार करावी. त्याअर्थी मे न्यायालयाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही तक्रार उपस्थित झाली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. कोटांचे सही शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ :- साक्री,
दि. ०२/०८/२०२३

**क. लिपीक** (शिक्का) **सहा.अधिक्षक**
**फौजदारी न्यायालय साक्री** **फौजदारी न्यायालय साक्री**

**(दिवाणी व फौजदारी न्यायालय क.स्तर साक्री जि. धुळे )**

**प्रोसेस जमा** **ॲड. श्री. अक्षय. ए. सगर,साक्री**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क. ४१६/२०२२**

गं.भा. मंगला बाळु पाटील व इतर, उ.व.५९, धंदा-घरकाम,
राहणार म्हसदी प्र. नेर, ता.साक्री, जि.धुळे ....**अर्जदार**

**।। विरुद्ध ।।**

**कोणीही नाही** .....**सामनेवाला**

मयत - कै. बाळु जगन्नाथ पाटील (मृत्यू दि. ०७/११/२०२२)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळण्यासाठी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, येथे दि. ०१/१२/२०२२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की. कै. बाळु जगन्नाथ पाटील यांचे दिनांक ०७/११/२०२२ रोजी निधन झाले आहे, मयताच्या मृत्यूसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

१. गं. भा. मंगला बाळु पाटील,
२. सौ. संगिता अनिल देवरे,

मयतांस वरील प्रमाणे वारस असुन, यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खातेनिहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखला आवश्यक असल्याने वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतिरिक्त कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क. स्तर, साक्री कोर्ट क. २ यांचे न्यायालयात दिनांक १४/०८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत, तक्रार नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित अरण्यात येईल. सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ - साक्री
दिनांक- ०१/०८/२०२३ आदेशावरुन,

(शिक्का)

**क. लिपीक** **अधिक्षक**
**कामगिरी कारकुन, साक्री** **सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय,साक्री**

दैनिक
लक्ष महाराष्ट्र






# धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये ‘वन महोत्सव’ साजरा


















धुळे।
विलेपार्ले केळवाणी मंडळ मुंबई संचलित धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये २८ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत ‘वनमहोत्सव’ साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणाबाबत विशेष मार्गदर्शन केले. या उत्सव दरम्यान शाळेत विविध उपक्रम राबविण्यात आले. नर्सरी ते इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी वन महोत्सव सोबत ‘ग्रीन डे’ उत्सव साजरा केला. हिरवा रंग हा जीवन, निसर्ग आणि ऊर्जेचा रंग आहे. हे वाढ आणि समृद्धीशी संबंधित आहे. हिरव्या रंगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सर्व विद्यार्थी हिरव्या रंगाच्या वेगवेगळ्या छटा परिधान करून आले होते. शिक्षकांनी शाळेचे सभागृह फळे, भाज्या, प्राणी इत्यादी हिरव्या रंगाच्या वस्तूंनी सजवले. मुलांनीही हिरव्या रंगावरील गाण्याचा आनंद लुटला. वनमहोत्सवाची सुरुवात इयत्ता ‘सहावी ब’ च्या विद्यार्थ्यांनी विशेष परिपाठाने केली. परिपाठ दरम्यान ‘चिपको आंदोलन’ ही नाटिका सादर करत झाडांचे जीवनातील महत्त्व सांगून ‘पृथ्वी आणि स्वत:ला वाचवा’ असा संदेश देण्यात आला. नर्सरी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत शाळेतर्फे रोपे लावून त्यांचे रक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेतली. तिसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘माझे आवडते झाड’ या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर मेकिंग स्पर्धेतून ‘झाडे वाचवा’ या विषयातून मार्मिक संदेश दिला. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन व उपमुख्याध्यापिका रिचा तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली अर्चना धनवजिर, चित्रा प्रजापत, विरेंद्र सैदाणे, दिपेंद्र गिरी, सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी सर्व उपक्रम यशस्वी होण्यासाठी संयोजन केले.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र






# धुळ्यात डिझेलनं भरलेला टँकर उलटला






















धुळे । शहरापासून काही किलोमीटर अंतरावर डिझेलचा टँकर भररस्त्यात पलटी झाला आहे. टँकर पलटी झाल्याने संपूर्ण डिझेल रस्त्यावर सांडलं आहे. हे डिझेल पाहूण नागरिकांनी येथे मोठी गर्दी केली. पलटी झालेल्या डिझेलच्या टँकरमधून पडणारे डिझेल गोळा करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे. मिळेल त्या भांड्यात आणि कॅनमध्ये परिसरातील नागरिकांनी डिझेल भरून नेण्यास सुरुवात केली आहे. मुंबईकडून इंदोरकडे जात असताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मुंबई आग्रा महामार्गावर चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा डिझेल टँकर पलटी झाला आहे. या दुर्घटनेत टँकर चालक जखमी झाला असून सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्याचबरोबर अग्निशमन विभागाचे पथक देखील घटनास्थळी दाखल झाले आहे. तसेच उपस्थित नागरिकांना बाजूला करत मोठी दुर्घटना टाळण्यासाठी आपले कार्य सुरु केले आहे. सध्या पेट्रोल-डिझेलच्या किंमती गगनाला भीडल्या आहेत. महागाईने त्रस्त झालेल्या काही नागरिकांनी हे डिझेल मिळेल त्या भांड्यात भरण्यास सुरुवात केली आहे. याचे काही व्हिडिओ देखील समोर आलेत. सध्या हे व्हिडिओ व्हायरल होत आहेत. (जीजे १२/बीव्ही ०५५५) आज सकाळी मुंबई-आग्रा महामार्गावरील उड्डाणपुलावरुन जात असताना मोहाडीनजीक पलटी झाला. दुचाकीस्वाराला वाचविणाच्या प्रयत्नात टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. टँकर पलटी झाल्यानंतर तो डिव्हाडरला ठोकला गेला. डिव्हाडरला लागूनच असलेला विद्युत पोलही आडवा झाला. घटनेची माहिती मिळताच वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. वाहतूक नियंत्रण शाखेचे भूषण कोते तसेच दत्तात्रय शिंदे यांनी महावितरणलाा फोन करून तात्काळ वीज वाहिनी बंद केली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. या अपघानंतर हजारो लिटर डिझेल पुलावरुन वाहत होते. अनेकांनी संधी साधत रस्त्यावर वाहणारे डिझेल बॅरेलमध्ये भरुन नेले.

संकलन : दिपक वाघ